## थोडक्यात...

## वलंगवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



(अजहर खान/ दै.धर्मयोध्दा)

**सेलू-** तालुक्यातील वलंगवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहचे आरंभ १९ मार्च गुरुवारपासून झाले असून सांगता दिनांक २७ मार्च शुक्रवारी होणार आहेत यादरम्यान मेघ भारती संस्थांनच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सेलू तालुका भाजपा किसान मोर्चाचे तालुका अध्यक्ष श्री ह.भ. प.दगडोबा जोगदंड पाटील महाराज यांनी दिली आहे कार्यक्रमाच्या सांगताच्या शुक्रवारी श्री ह.भ.प.योगेश महाराज आकात सातोणेकर शिवचरित्रकार यांचे कीर्तन होणार असून महाप्रसादाचा भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे आज मंगळवार रोजी कुपटा जिल्हा परिषदेच्या सदस्या सो योगिता रणजीत मोरे वालूर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य नागेश साडेगावकर सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक युवा नेते शैलेश तोष्णीवाल यांनी अखंड हरिनाम सप्ताह मध्ये उपस्थित राहून श्रवणाचा लाभ घेतला वलंगवाडी ग्रामस्थातर्फे त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आले.

## निवृत्त शिक्षक स्व.बाबुराव सिताराम शहाणे यांचे निधन



**जिंतुर-** निवृत्त शिक्षक स्व.बाबुराव सिताराम शहाणे यांना दिनांक २२.३.२६ रविवार, ला देवाज्ञा झाली. अंत्यविधी सोमवारी राहत्या घरून सकाळी ११.१५ वाजता सोनार समाज वैकुंठधाम येथील हिंदूधर्म प्रमाणे अंत्यविधी करण्यात आली त्यावेळी सोनार समाज व हरी भक्तांनी त्यांना मानवंदना देण्यात आली.त्याच्या पश्चात तीन मुले पाच मुली नातू नातवनी पतू असा मोठा परिवार आहे जिंतूर तालुक्यातील प्रतिष्ठ व्यापारी अरुण शहाणे सुधीर शहाणे किशोर शहाणे यांचे वडील होते.

## डासांचा उपद्रव वाढला

**परभणी –** शहरात मोठ्या प्रमाणावर डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे तापासारखे आजार बळावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डासांचा बंदोबस्त करण्यासाठी महानगरपालिकेने धूर फवारणी करावी, वाढत्या डासांमुळे लहान मुलांना डेंग्यु मलेरीया सारख्या अजारांचा सामना करावा लागत आहे तर उन्हाळ्याच्या दिवसात पडणाऱ्या पासामुळे साचलेल्या पाण्यापासुन डासांची निर्मिती होऊ शकते यावर काहीतरी प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## पाथरीत जुगार-मटका बुकीवर मोठी कारवाई! डीआयजी शहाजी उमाप यांच्या पथकाचा धडाका; १३ आरोपी जेरबंद, दिड लाखांचा मुद्देमाल जप्त

**पाथरी -** परभणी जिल्ह्यातील पाथरी शहरात अवैध जुगार व मटका बुकींविरोधात पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई करत गुन्हेगारीला जोरदार चाप लावला आहे. पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखालील विशेष पथकाने २३ मार्च २०२६ रोजी दोन ठिकाणी धाड टाकून एकूण १३ आरोपींना ताब्यात घेतले असून सुमारे १ लाख ४९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाथरीतील रशिद कॉलनी परिसरात एका शेडमध्ये 'तिर्रट' नावाचा जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर पथकाने छापा टाकला. यावेळी ८ जणांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांच्या ताब्यातून ३३,२०० रुपये रोख व ७ मोबाईल असा एकूण ८३,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात गु.र. नं. १४८/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार



गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, नायब हॉटेलच्या बाजूला असलेल्या दुसऱ्या ठिकाणी 'फन टारगेट चक्री' (बिंगो) नावाचा ऑनलाइन जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तेथेही धाड टाकून ५ आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून ३६,६०० रुपये रोख, मोबाईल, संगणक व साहित्य असा ६६,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी गु.र. नं. १४९/२०२६ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही कारवायांमध्ये मिळून पोलिसांनी ६९,८०० रुपये रोख, ८ मोबाईल, संगणक व इतर साहित्य असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणांचा पुढील तपास पोलीस कर्मचारी अनिल हत्तीअंबीरे व नारायण शितळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. या यशस्वी कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, या धाडसी कारवाईबद्दल पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी संपूर्ण पथकाचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले आहे.

'खबर' हेल्पलाइनचे आवाहन: नागरिकांनी आपल्या परिसरात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांविषयी माहिती देण्यासाठी पोलीस प्रशासनाने 'खबर' हेल्पलाइन (९१ ५० १०० १००) सुरू केली आहे. फोन किंवा व्हॉट्सअॅपद्वारे माहिती देऊन नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मालेगावात श्रीराम नवमीची जय्यत तयारी; सर्वत्र भगवमय वातावरण

(प्रदिप सावले/ दै.धर्मयोध्दा)

**मालेगाव-** श्रीराम नवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात जय्यत तयारी सुरू झाली असून सर्व भक्तजन उत्सवाच्या तयारीला लागले आहेत ठिकठिकाणी सजावट,भगवे झेंडे व पताकांमुळे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील विविध मंडळे, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुणांनी एकत्र येत उत्सव भव्य करण्यासाठी पुढाकार घेतला आहे प्रत्येक भागात नियोजनबद्ध तयारी सुरू असून उत्सवाची धामधूम दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे सार्वजनिक सहभागावर विशेष भर हा उत्सव सर्व गावकऱ्यांचा असून प्रत्येक नागरिक आपल्या परीने आर्थिक व शारीरिक योगदान



देत आहे श्रीराम भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सव अधिक भव्य करण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे यंदाचा श्रीराम नवमी उत्सव भक्ती,उत्साह आणि सामूहिक एकतेचे प्रतीक ठरणार असल्याचे चित्र सध्या मालेगाव शहरात पाहायला मिळत आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोहेटाकळीचे राज्यस्तरीय परीक्षेत घवघवीत यश

(मुरलीधर गोंगे/ दै.धर्मयोध्दा)

**पाथरी –** राजर्षी शाहू महाराज सामाजिक संस्था, खोंदला (ता. कळंब, जि. धाराशिव) यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मी ज्ञानी होणार' या सामान्य ज्ञानावर आधारित राज्यस्तरीय उपक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोहेटाकळीने यंदा प्रथमच सहभाग नोंदवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत इयत्ता ३ री ते ५ वी गटातून कार्तिकी संतोष बागल हिने १०० पैकी ९६ गुण मिळवत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी गटातून कोमल सखाराम वाघमारे आणि वेदिका बळीराम गोंगे या दोन्ही



विद्यार्थिनींनी प्रत्येकी ९६ गुण मिळवत राज्यात तृतीय क्रमांक मिळवला. तिन्ही विद्यार्थिनी राज्यस्तरीय ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिकासाठी पात्र ठरल्या आहेत. याचबरोबर शाळेतील इयत्ता ४ थीची विद्यार्थिनी शिवनेरी संतोष बागल हिनेही ९० गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यासाठी गावचे उपसरपंच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, पालक, प्रतिष्ठित नागरिक .शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थिनींच्या यशाबद्दल शाळेचे माजी शिक्षक श्री अशोक डांबे यांनी प्रत्येकी ५०० रुपये याप्रमाणे एकूण २००० रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरव केला. तसेच शाळेचे शिक्षक श्री मुंजा रोडे यांनीही १२५० रुपयांचे रोख बक्षीस देऊन विद्यार्थिनींचा उत्साह वाढवला व त्यांच्या पुढील उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या उल्लेखनीय यशामुळे परिसरात शाळेचे नाव उंचावले असून सर्व स्तरांतून विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ''पाथरीत महिला सक्षमीकरणाचा उत्सव; बचत गटांचा गौरव, नगरपरिषदेकडून ५ गाळ्यांची घोषणा''




''पाथरी नगर परिषदेत आयोजित करण्यात आलेला महिला मेळावा हा महिलांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी उपक्रम आहे. शहरातील महिला बचत गटांनी केलेले कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या प्रगतीसाठी नगर परिषद कटीबद्ध आहे. महिलांच्या व्यवसायाला चालना मिळावी यासाठी नगरपालिकेमार्फत नवीन आठवडी बाजार येथे ५ गाळे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हेच शहराच्या सर्वांगीण विकासाचे बळ असून, त्यासाठी नगर परिषद कायम त्यांच्या पाठीशी उभी राहील.''

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी -** नगर परिषद पाथरीच्या दीनदयाल जन अजीविका अभियान विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला महिला मेळावा मंगळवारी (दि. २४ मार्च २०२६) उत्साहात संपन्न झाला. महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने नगर परिषद कार्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास नगराध्यक्ष श्री. आसेफ खान शेरगुल खान, उपनगराध्यक्ष श्री. अलोक चौधरी यांच्यासह नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध महिला बचत गटांनी आपल्या व्यवसायात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती मनीषा कदम व श्रीमती सूर्यमाला मोतिपवळे यांनी महिलांना मार्गदर्शन करत आत्मनिर्भरतेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाला शहरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचे निवेदन



(अली चाऊस/ दै.धर्मयोध्दा)

**गंगाखेड -** राज्यातील वृत्तपत्र उद्योगास आर्थिक बळकटी देण्यासाठी जाहिरात दरात १५० टक्के वाढ करण्यात यावी व पत्रकारांसाठी विविध प्रशासकीय धोरणांमध्ये सुधारणा कराव्यात आदी मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडिया गंगाखेड शाखेच्या वतीने सोमवार २३ मार्च रोजी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून कार्यरत असून शासनाच्या योजना, निर्णय व धोरणे जनतेपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे निवेदनात नमूद करून गेल्या काही वर्षांत कागद, प्रिंटिंग साहित्य, वीज व इतर खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असतांनासुद्धा जाहिरात दरात मात्र अपेक्षित वाढ झाली नाही. त्यामुळे लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची चिंता व्यक्त करीत ई-टेंडर जाहिराती पूर्ण स्वरूपात वृत्तपत्रांत प्रसिद्ध करणे, जाहिरातींसाठी किमान आकार निश्चित करणे, शासकीय जाहिरातींचे देयक ३० दिवसांत अदा करणे, लघु व मध्यम वृत्तपत्रांना समान संधी देणे तसेच शासन निर्णय व बैठकींची माहिती पारदर्शकपणे प्रसिद्ध करणे, जिल्हास्तरावर जाहिरात वितरणात होत असलेला भेदभाव थांबवून सर्व जाहिराती माहिती खात्यामार्फतच देण्यात याव्यात आदी मागण्या शासनाकडे करत जाहिरात यादीत समावेशासाठी वृत्तपत्रांनी केलेल्या अर्जांची तातडीने तपासणी करून त्यांना न्याय देण्याची अपेक्षा ही या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष अन्वर शेख लिंबेकर, शिवाजी कांबळे, अली चाऊस, गोपाळ मंत्री, अंकुश कांबळे, रामप्रसाद ओझा, सय्यद सद्दाम, प्रेम सावंत, राजेश्वर वट्टमवार, मोसीन खान आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून या सर्व मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## वडी येथे श्री सोमेश्वर यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** तालुक्यातील मौजे वडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री सोमेश्वर यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा २४ मार्च ते ३१ मार्च २०२६ दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडणार असून परिसरातील भाविक भक्तांसाठी हा आध्यात्मिक पर्वणीचा काळ ठरणार आहे. या धार्मिक सोहळ्याचे मार्गदर्शन श्री ह.भ.प. गणेश महाराज कुटे यांचे लाभत असून श्रीमद भागवत कथा प्रवक्ते म्हणून श्री ह.भ.प. अशोकजी महाराज ताल्डे वडीकर यांची उपस्थिती राहणार आहे. सप्ताहाचे हे २९ वे वर्ष असून विविध धार्मिक, भजन, कीर्तन आणि पारायण कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, दुपारी १ ते ४ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ तसेच रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम पार पडणार आहेत. सप्ताहात विविध कीर्तनकार आपली सेवा देणार असून यात शिवदास महाराज जंगले, भागवत महाराज नखाते, पांडुरंग महाराज मुंजाळ, अन्सीराम महाराज चव्हाळकर, युवारत्न संतोष महाराज पवार, दीपक महाराज मेटे व रोहिदास महाराज मस्के यांचा समावेश आहे. दि. ३० मार्च रोजी भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच मंगळवार दि. ३१ मार्च रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत आळंदी येथील श्री ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहासाठी कुटे पाटील मंडळ यांच्याकडून महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली असून विविध भजनी मंडळे, गावकरी व नवयुवक मित्र मंडळ वडी यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास परिसरातील सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून कीर्तन, भागवत कथा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शीरखुर्मा पार्टीतून ताडकळस येथे बंधुभावाचा गोडवा; ईद मिलाप उत्साहात संपन्न



(वजीर पठाण/ दै.धर्मयोध्दा)

**ताडकळस-** पवित्र रमजान महिन्यातील रोजा, नमाज, जकात आणि फित्रा या इस्लाम धर्मातील महत्त्वपूर्ण कर्तव्यांची पूर्तता केल्यानंतर साजऱ्या होणाऱ्या ईद-उल-फितर निमित्त ताडकळस येथील मेहराज मस्जिद कमिटीच्या वतीने आयोजित ईद मिलाप कार्यक्रम आज उत्साहात संपन्न झाला. एक आलिंगन एकतेचा सामाजिक सलोख्याचा'' या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम मेहराज मस्जिद, शिवाजीनगर, पूर्णा रोड येथे पार पडला. कार्यक्रमादरम्यान इस्लाम धर्मात बंधुभाव, दानधर्म, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश अधोरेखित करण्यात आला. रमजान महिन्यातील संयम, त्याग आणि आत्मशुद्धीच्या शिकवणीचे महत्त्व यावेळी उपस्थितांना पटवून देण्यात आले. या प्रसंगी शीरखुर्मा पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ''ईद मुबारक''च्या शुभेच्छा दिल्या, तर विविध समाजघटकांतील नागरिकांनीही सहभागी होत धार्मिक सौहार्दाचे दर्शन घडविले. या वेळी ताडकळस व परिसरातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार, व्यापारी, शिक्षक, डॉक्टर, समाजसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईद मिलापच्या माध्यमातून धर्म, जात-पात विसरून सर्वांनी एकत्र येत एकोप्याचा संदेश दिला. समाजात शांतता, प्रेम आणि बंधुभाव टिकवण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले

## जिंतुर – जालना महामर्गाचे रुंदीकरण काम निकृष्ट दर्जाचे ! संबधित यंत्रणेने लक्ष घालण्याची मागणी , अधीक्षक अभियंता नांदेड यांना निवेदन

(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा-** जिंतुर - जालना महामार्गाचे पिंपरी गिते येथून सुरु असलेले रुंदीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून सदर रस्त्यावर खोदकाम करण्यात आल्यानंतर खडी टाकून रस्ता उकरून काढलेली माती त्यावर टाकून दबाई केली जात आहे. जिंतुर - जालना महार्गावरील पिंपरी गिते ते जिंतुर दरम्यान रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे.सदर रस्त्याची पुर्वीची रूंदी सात मिटर असून दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा दिड मिटर कच्चा रस्ता खोदून सदर रस्त्याचे दोन्ही बाजूने दिड मिटर रुंदी वाढवून ३ मिटर रुंद करून सदर रस्ता १० मिटर केला जात आहे.दरम्यान एक ते दिड फुट खोदकाम केल्यानंतर सदर रस्त्यावर बारीक खडी टाकल्यानंतर त्यावर पक्के मुरुम न टाकता खोदून काढलेली माती त्या खडीवर टाकून वरच्या भागात त्याची दबाई केली जात नसल्याने नागरीकामध्ये आश्चर्य



व्यक्त होत असून सदरील निकृष्ट दर्जाच्या कामाची सर्वत्र चर्चा होत आहे.या बाबतीत आनेक नागरिकांना काम करणाऱ्या कामगारांना या बाबतीत विचारणा केली असता सर्व कामगार बाहेर राज्यातील असल्याने कोण काय म्हणतंय हे कळत नसुन त्यांनी काम उरकण्यावर झपाटा लावला आहे.सदर कामावर कोणताही जबाबदार अभियंता उपस्थित नसुन दरम्यान सदर प्रकरणी रस्ते प्राधिकरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून सदरील कामाच्या दर्जा कसा राखता येईल याकडे लक्ष घालावे अश्या मागणीचे निवेदन अधीक्षक अभियंता सार्वजनिक विभाग परिमंडळ नांदेड यांना देण्यात आले असून जिल्हाधिकारी परभणी यांनाही माहितीत्सव कळविण्यात आले आहे.

निकृष्ट काम होत असल्याने लवकरच खराब होण्याची भिती

मागील अनेक दिवसापासून रखडत पडलेला जिंतूर संभाजीनगर महामार्गावरील पिंपरी गीते ते जिंतूर दरम्यान रस्ता खूप दिवसाच्या प्रतीक्षेनंतर सुरुवात झाली खरी मात्र तो अत्यंत निकृष्ट दर्जाचा होत असल्याने तो येणाऱ्या पावसाळ्यातच खराब होतो की काय याची भीती नागरिकांना लागली आहे त्याचबरोबर या कामावर शासनाच्या कोणाचेही नियंत्रण राहिले नाही काय असा प्रश्न नागरिकांमधून निर्माण होत आहे. सदर कामाला खूप दिवसानंतर महुर्त लागला आहे जर हे काम निकृष्ट झाले तर पुन्हा पुढील पंधरा वर्षे हा रस्ता होणार नाही आणि तालुक्यातील नागरिकांना खूप मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागेल त्यामुळे हे काम दर्जेदार होणे गरजेचे आहे सदर काम बाहेर राज्यातील गुत्तेदारांना दिलेले असून गुत्तेदार अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करत आहे कामाबाबत विचारणा करण्यासाठी कामावर गेले असता येथील कामगारांना आपण बोललेले काही समजत नाही तर येथे कोणताही जबाबदार अभियंता उपस्थित नसतो आसेच चालू राहिले तर येणाऱ्या पावसाळ्यातच हा संपूर्ण रोड खड्डेमय होणार आहे आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची असेल त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत वेळीच हस्तक्षेप करून सदर काम दर्जेदार कसे होईल यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे चारठाणा येथिल प्रभाकर कुरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao